# महाराष्ट्र शासन
# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२३/प्र.क्र.०७/सीईटी/२०२३/ दिनांक :-२०/०८/२०२३.

प्रति,
संपादक,
महाराष्ट्र टाईम्स (पुणे आवृत्ती)
मुंबई

**संदर्भ :- आपल्या दैनिकाच्या पुणे आवृत्तीमध्ये प्रसिध्द " इंजिनीअरींगच्या जागांचा कॉलेजकडून लिलाव" या बातमीसंदर्भात...**

**महोदय,**

दिनांक २०/०८/२०२३ रोजी महाराष्ट्र टाईम्स दैनिकाच्या पुणे आवृत्तीमध्ये प्रसिध्द " इंजिनीअरींगच्या जागांचा कॉलेजकडून लिलाव..." या बातमीबाबत पुढील खुलासा आपल्या दैनिकाच्या सर्व आवृत्यांमध्ये कृपया प्रसिध्द करावा.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातंर्गत असलेल्या तंत्रशिक्षण विभागातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा व संस्थास्तरावरील जागांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकामधील मुद्या क्रमांक १३ (पदव्युत्तर पदवी माहिती पुस्तिका २०२३-२४ पृष्ठ क्र. २६ व पदवी माहिती पुस्तिका २०२३-२४ पृष्ठ क्र. ३५ ) अन्वये नियम/सुचनांचे तंतोतंत पालन करुन संस्थेने प्रवेश प्रक्रिया राबविण्याच्या सूचना या अभ्यासक्रमांची केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापुर्वी देण्यात आली आहे. तसेच संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना याबाबत प्रभावी पर्यवेक्षण करण्याच्या त्याचप्रमाणे महाविद्यालयांकडून नियमबाह्य पध्दतीने प्रवेश झाल्याचे सिध्द झाल्यास असे प्रवेश प्रवेश नियामक प्राधिकरणाचे स्तरावरुन रद्द होतील याची स्पष्ट जाणीव संबंधित महाविद्यालयांना करुन देण्यात यावी अशा स्वतंत्रपणे सूचना देण्यात आल्या आहेत. या सर्व सूचना संस्थास्तरावरील प्रवेश सुरू होण्यापुर्वीही सर्व संबंधितांना दिनांक १४/०८/२०२३ रोजी पुन्हा देण्यात आल्या आहेत. या कार्यालयामार्फत केंद्रिभूत प्रवेश प्रकियेच्या तीन फेऱ्या राबविण्यात आलेल्या असून

तदनंतर संस्थानिहाय अभ्याक्रमनिहाय रिक्त राहीलेल्या जागांबाबतची माहिती विद्यार्थी/पालक/संस्था यांच्या माहितीकरीता या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तसेच प्रवेश प्रक्रिया राबविताना सर्व प्रवेश गुणवत्ता क्रमांकानुसारच देण्यात यावेत व विद्यार्थ्यांनी केलेल्या अर्जांची यादी व त्यांची अंतिम गुणवत्ता यादी (Final Merit List) संस्थेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात यावी आणि सीईटी कक्षाच्या माहितीकरीता सदरील यादी ई-मेलद्वारे पाठवावी तसेच पदवी व पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रियेच्या उक्त नियम / सूचनांचे पालन जे महाविद्यालय करणार नाहीत अशा महाविद्यालयांमधील प्रवेश नियमानुसार झाले नसल्याचे सिध्द झाल्यास असे प्रवेश प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या स्तरावरुन रद्द करण्यात येतील असेही सर्व संचालक/प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालये यांना अवगत करण्यात आलेले आहे.

**(महेन्द्र ब. वारभुवन, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**